

अर्पण
बाल लैंगिक शोषणापासून मुक्तिकडे

# टाकाऊपासून टिकाऊ

## ही ॲक्टिव्हीटी कोण करू शकतं?

सर्वांना

## ही ॲक्टिव्हीटी तुम्ही केव्हा करू शकता?

- रिकाम्या/फावल्या वेळात.
- जेव्हा मुलांना 'टाकाऊपासून टिकाऊ' या संकल्पनेची ओळख करून द्यायची असेल तेव्हा.

## हे तुम्ही कसे कराल?

- घरातील तुम्ही अजिबात वापरत नसलेल्या किंवा तुमच्या दृष्टीने टाकाऊ/निरूपयोगी असलेल्या वस्तू शोधून काढा.
- या वस्तूंचा सदुपयोग किंवा पुनर्वापर करण्याचे विविध मार्ग शोधा आणि त्यात मित्रांना किंवा कुटुंबीयांना सहभागी करून घेणार आहात की नाही ते ठरवा. उदाहरणार्थ:

1. वर्तमानपत्रांच्या रद्दीपासून कागदी पिशव्या तयार करून त्यांच्यावर सजावट करणे
2. बुटांच्या खोक्यांपासून कंटेनर्स तयार करणे
3. वापरात नसलेल्या कपड्यांपासून मास्क्स तयार करणे.

## ही ॲक्टिव्हीटी तुम्हाला कशा प्रकारे मदत करेल?

- तुमच्या कल्पनाशक्तीला आणि निर्माणक्षमतेला (सर्जनशीलतेला) चालना मिळाल्यामुळे ती आणखीन बहरेल.
- मुलं गृहपयोगी वस्तूंचा पुनर्वापर करायला शिकतील.
- यानिमित्ताने घरात एक चांगला पायंडा पडेल, स्वतःला आणि इतरांना चांगली सवय लावून घेता येईल.

## काय साहित्य लागेल?

निरूपयोगी किंवा टाकाऊ वस्तू आणि हस्तकला तसेच
सजावटीसाठी लागणारे साहित्य (गरजेप्रमाणे) जसे रंग, डिंक इत्यादी

